# देवगिरी मिरर

● संपादक : राम गंगाराम तरटे ●

● साप्ताहिक ● नांदेड ● वर्ष १ ले ● अंक १४ वा ● रविवार, दिनाक ०१ मार्च २०२६ ● RNI No. MAHMAR/25/A2579 ● पाने ४ ● किंमत : २ रुपये

● Weekly ● Nanded ● Year - 01 ● Issue No. 14 ● sunday, Date 01 March 2026 ● RNI No. MAHMAR/25/A2579 ● Page 4 ● Price : 2 ₹


## वेदनेला स्पर्श करणारे काव्य

**रुचिरा बेटकर यांचा पहिलाच** 'कोलाज भावनांचा' हा कवितासंग्रह प्रेम, विरह, आपुलकी, जिव्हाळा, मनातील कोलाहल मांडत असतानाच, सामाजिक जाणिवा जपणारा कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहात प्रियकर, प्रेयसी, मिलन, दुरावा, विश्वास, अविश्वास, ओढ, या भावना जशा व्यक्त होतात. तशाच या कवितासंग्रहातून शेतकरी, कष्टकरी, स्त्री जीवनातील दुःख, भूक दारिद्र्य यावरही लख्ख प्रकाश टाकण्यात आला आहे .एवढेच नाही तर 'कोलाज भावनांचा' मधून कवयित्री रुचिरा बेटकर यांनी लिहित्या हाताना अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याचे आवाहन करत एक प्रकारे व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले आहे. म्हणून कवयित्री रुचिरा बेटकर यांचा 'कोलाज भावनांचा' हा कविता संग्रह वाचकांच्या मनाचा ठाव घेतो.

जगाने एकाकीपणाचा उंबरवठा केंव्हाच ओलांडला आहे. प्रत्येक नात्यातील संवाद मोठ्या प्रमाणात दुरावतो आहे. माणसे स्वतःशी बोलू लागली आहेत. पण यात आत्मचिंतन किंवा आत्मभान अजिबात दिसत नाही. स्व:हितासाठी होणारे बोलणे सोडले तर आपुलकी, जिव्हाळा किंवा सुख दुःख विचारण्यासाठी होणारे संवाद आता जवळजवळ पोरके होत आहेत. जणू त्यांच्या डोक्यावरून आपलेपणाचा पदर आईने हळुवार ओढून घेतला आहे आणि संवाद नावाचे बाळ एकाकी, स्वतःशीच आक्रोश करते आहे. प्रत्येक नाते उसवत असताना ते जोडण्यासाठी कुणी तरी हट्ट करावा, संवादाच्या धाग्यांनी ते पुन्हा घट्ट विनावेत असेही वातावरण दूरदूर दिसत नाही. अनुभूतीने सुख देणारे प्रेम आता प्रेम उरले नाही. तर सुख ओरबाडून घेण्याची अघोरी भूक वाढताना दिसते.'तिला' काय हवंय हे स्पर्शातून ओळखण्याची जाणीव बोथट झाली आहे. जगाचा पोशिंदा उपाशी मरतो आहे. आत्महत्या करतो आहे. त्याच्या पोराबाळांच जीवन आभाळ होतं आहे. अशी भयावह परिस्थिती सर्वत्र असताना नितळ हृदयाचा हृदयासाठी संवाद साधणारा रुचिरा बेटकर यांचा 'कोलाज भावनांचा' हा कवितासंग्रह नव्याने संवाद निर्माण करण्यासाठी हाक देणारा ठरणार आहे.

मुळात शिक्षिका असलेल्या कवयित्री रुचिरा बेटकर ह्या संवेदनशील मनाच्या आहेत. त्यांच्या मनात प्रेमभाव ओतप्रोत भरलेला आहे. साचलेपणाच्या पल्याड जाऊन त्या सुखी जीवनाकडे आशादायी दृष्टीने बघतात.मनातील उत्कट प्रेम मांडतानाच त्यांना समाजातील दुःख वेदना अस्वस्थ करतात, हे त्यांच्या अनेक कवितातून दिसून येते. 'समाज' या कवितेतून त्या लिहितात –

**'आयुष्य जगताना भीती वाटते समाजाची**
**हे जिवंत कलेवर उगाच चालण्याची...'**



कवयित्री रुचिरा बेटकर यांनी शेतकऱ्यांच्या नशिबी आलेले दुःख, वेदनांची जाणीव शासनाला कधी होणार? असा थेट सवाल उपस्थित केला. व्यवस्थेला प्रश्न विचारतला. दुष्काळ, दारिद्र्य, कर्ज, भूक, आत्महत्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्यानंतर त्यांच्या लेकरांचा होणारा वनवास या बाबी ती जगासमोर मांडते . पोशिंदा या कवितेत त्या लिहितात–

**'ना सोसे बापास दारिद्र्य भार**
**मानिले आभार शेवटचे...'**

दारिद्र्य आणि कर्जांनी खचून गेलेला बाप आत्महत्या करतो आणि शेवटचे आभार मानून जगाचा निरोप घेतो. अशी वेदनादायी कविता लिहून शेतकऱ्यांच्या जीवनातील दाहक वास्तविकता रुचिरा बेटकर यांनी अत्यंत संवेदनशीलपणे मांडली आहे.

महात्मा फुले यांनी तत्कालीन परिस्थितीत तत्कालीन सरकारला 'शेतकऱ्यांच्या आसूड' मधून 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांची होणारी लूट यावर थेट प्रश्न उपस्थित केले होते. भारतीय स्वातंत्र्यानंतरही शेतकऱ्यांच्या जीवनात फारसा बदल झाला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या नशिबी असलेले दारिद्र्य, कर्ज आणि त्यातून होणाऱ्या आत्महत्या हा कवयित्री रुचिरा बेटकर यांना चिंतेचा विषय वाटतो.

**'पोशिंदा जगाचा, तूच अन्नदाता**
**जाण होईल केव्हा शासनाला?'**

असा जळजळीत प्रश्न विचारण्याचे धाडस ही कवयित्री करते. याचा अर्थ कवयित्री सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने बंडाची भाषा करू लागते आहे.

'लेखणी' या कवितेतून कवित्री रुचिरा बेटकर

**राम तरटे**

यांनी' लिहित्या हातांनी अन्यायविरुद्ध पेटून उठले पाहिजे, अशी हाक दिली आहे.

**'हातामध्ये लेखणी घेऊन**
**आता आपण उठलं पाहिजे**
**जंगलामधल्या वनव्यासारखे**
**आता आपण पेटलं पाहिजे'**

अशी सामाजिक परिवर्तनाच्या क्रांतीची भाषा ती बोलू लागते.

रुचिरा बेटकर यांनी कोलाज भावनांचा मधून प्रेमभाव, विरह या मनाच्या गाभाऱ्यातील हळव्या, नाजूक भावना मांडल्या असल्या तरी याच कवितासंग्रहातून त्या व्यवस्थेला प्रश्न विचारता. वाचकांना आशादायी जीवनाची वाट दाखवतात.' सावल्या' या कवितेतून व्यक्त होताना त्या लिहितात –

**'अश्रू तू गाळू नकोस**
**हसणे तू टाळू नकोस**
**आयुष्यातील रडगाणे**
**क्षणोक्षणी गाऊ नकोस '**

म्हणजेच जगण्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन पेरण्यासाठी त्यांनी केलेला हा प्रयत्न निश्चितपणे आशादायी जीवनाची स्वतंत्र वाट निर्माण करणार आहे.


'आक्रोश' कवितेतून कवित्री रुचिरा बेटकर यांनी नैसर्गिक आपत्तीने निर्माण केलेल्या, काळजाचा बांध फोडणाऱ्या भावना व्यक्त केल्या आहेत.

**'दुभंगली धरती आकाश फाटले**
**माय लेकरांचे नाते तुटले'**

अशा संवेदनशील भावना त्यांनी या कवितेतून व्यक्त केल्या आहेत. 'मर्यादा' या कवितेतून रुचिरा बेटकर यांनी कष्ट करून आपल्या संसाराचा गाडा हाकणाऱ्या कष्टकरी स्त्रीच्या घामाचा सुगंध शब्दबद्ध केला आहे . घरात दारिद्र्य असल्याने ठिगळाचं लुगडं नेसूनही आपल्या मुलांच्या भविष्यासाठी 'उन्हाळा' म्हणजे दारिद्र्याचे चटके सहन करते. हेही तितक्याच पोटतिडकीने त्या मांडतात.

**'ठिगळ लावून, दारिद्र्य झाकते**
**उन्हाळा सोसते, मुलांसाठी..'**

'मजल', 'बाईपण', 'निसर्गसोबती' या व अशा अनेक कविता कोलाज भावनांचा या





कविता संग्रहातील सामाजिक प्रश्नांची जाणीवाही वाचकांसमोर प्रांजळपणे मांडताना दिसतात. त्यामुळे कोलाज भावनांचा हा रुचिरा बेटकर यांचा कवितासंग्रह केवळ प्रेम, विरह, दुरावा, आत्मीय सुखाच्या भावनांनी नटलेला नाही. तर देशातील शेतकरी, कष्टकरी स्त्रिया, त्यांचे दुःख, दारिद्र्य, गरीबी, भूक या प्रश्नांवरही भाष्य करतो. आत्मभान जागृत करते. 'कोलाज भावनांचा' हा रुचिरा बेटकर यांचा कवितासंग्रह मनामनात जितका भावनिक ओलावा निर्माण करणार आहे, तितकाच तो निर्ढावलेल्या व्यवस्थेला प्रश्न विचारणारा, बंड करून पेटून उठण्यासाठी कवी, लेखकांकडून अशा करतो आहे . म्हणून कवयित्री रुचिरा बेटकर यांच्या कवितांना लोकमान्यता, वाचक मान्यता मिळेल , त्यांच्या कविता उत्तरोत्तर अधिक बहरत जातील असा विश्वास वाटतो.

---

### रुचिरा बेटकर यांच्या 'कोलाज भावनांचा' कविता संग्रहाचे आज दि.०१ मार्च रोजी हॉटेल विसावा पॅलस, नांदेड येथे प्रकाशन होत आहे. त्यानिमित्त....

## कोलाजच्या निमित्ताने...



**रुचिरा बेटकर**

**कोलाज भावनांचा** हा कवितासंग्रह आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होतो आहे. पण खंत एका गोष्टीची आहे की, माझा हा सोहळा पाहण्यासाठी माझे आई–वडील आपल्यात नाहीत... आई–वडिलांच्या नावाची चादर जेव्हा आयुष्यातून निघून जाते... तेव्हा आयुष्यातील प्रत्येक सकाळ हि जबाबदारी ची जाणिव करुन देत असते. कोलाज भावनांचा हा कवितासंग्रह म्हणजे माझ्या मनाच्या कॅनव्हासवर उमटलेल्या असंख्य भावनांच्या छटांचा एक प्रामाणिक कोलाज आहे. ही माझी पहिली कलाकृती माझ्या स्व.रंजना शेषराव बेटकर यांना समर्पित केली आहे. आयुष्याच्या प्रवासात भेटलेले क्षण, अनुभवलेली वेदना, लाभलेले आनंदाचे क्षण, अपूर्ण राहिलेली स्वप्ने, न बोलता राहिलेल्या भावना आणि मनाच्या खोल कप्प्यात साठून राहिलेली हुरहूर. या साऱ्यांनी मिळून कवितेने आकार घेतला आहे.

कोलाज हा शब्द मी जाणीवपूर्वक निवडला आहे, कोलाज म्हणजे चित्रकलेशी संबंधित असलेला शब्द आहे. यात रंगीत कागदाचे तुकडे किंवा कात्रण करून कॅनव्हासवरील चित्रावर रंगसंगती साधून त्यावरती चिटकवली जातात. आयुष्य हे एका सरळ रेषेत चालणारे नसते. ते रंगांनी, छटांनी, तुटक रेषांनी आणि अनपेक्षित वळणांनी बनलेले असते. म्हणून मला प्रत्येक गोष्टीत कोलाज दिसू लागला ढगाच्या आकारात, नदीच्या वळणात, पाना फुलांच्या रंगात, इंद्र धनुष्याच्या छटात...मी माझ्या मनातील प्रत्येक भावना कुठल्या ना कुठल्या प्रसंगाशी जोडत एक अर्थपूर्ण कोलाज साकारला.

कोलाज तयार करताना नशिबाने कोणताही कसाही कागदाचा तुकडा (अर्थातच सुख दुःखानुसार, व्यक्ती नुसार, परिस्थिती नुसार) कोलाजासाठी दिला तरी तो मी एखाद्या विशिष्ट जागी ठेवताना कसा, कधी आणि कोणाशी जोडायचा हे मी स्व–अनुभवाने शिकत गेले. हा तुकडा योग्य जागी ठेवताना माझं मन कधी हळवे तर कधी कठोर झाले.

माझ्यासाठी कविता म्हणजे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर ती आत्म्याची भाषा आहे. जेव्हा शब्द अपुरे पडतात, तेव्हा कविता जन्माला येते. या संग्रहातील प्रत्येक कविता ही माझ्या आयुष्यातील एखाद्या टप्प्याची, एखाद्या भावनेची साक्ष आहे. कधी प्रेमाच्या कोवळ्या भावना, कधी विरहाची सल, कधी घुसमट, तर कधी स्वतःला शोधण्याचा प्रयत्न. असे सारे भाव या कवितांमधून शब्दरूपाने व्यक्त झाले आहेत.

या संग्रहातील कविता वाचताना जर कुणाच्या डोळ्यांत हलकेसे पाणी आले, कुणाच्या ओठांवर स्मित उमटले, किंवा कुणाला स्वतःच्या भावनांना शब्द सापडले, तर त्याहून मोठा आनंद माझ्यासाठी दुसरा असुच शकत नाही. या कवितासंग्रहातून मी कोणतेही तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न करीत नाही. माझा हा प्रयत्न इतकाच आहे की वाचकांनी या कवितांमध्ये स्वतःला शोधावे. एखादी कविता वाचताना हे तर माझ्याच मनातले आहे अशी भावना त्यांच्या मनात उमटली, तर माझे लेखन सफल झाले असे मी समजेन. त्यासाठीच तर हा कोलाज भावनांचा आपल्या हाती देत आहे.

कोलाज भावनांचा दोषमुक्त व्हावा यासाठी मुद्रित शोधनांसह प्रस्तावांना देऊन या कवितासंग्रहाला उंचीवर नेणारे मार्गदर्शक तथा साहित्य अकादमी प्राप्त बालकवी डॉ. सुरेश सावंतसर , कवितासंग्रहाची पाठराखण करून लिहिण्याचे बळ देणारे ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी सर आणि हा कविता संग्रह आपल्या हाती देण्यासाठी अत्यंत आत्मीयतेने प्रकाशन सिद्ध करणारे इसाप प्रकाशनाचे प्रकाशक दत्ता डांगे सर, अतिशय सुंदर मुखपृष्ठ रेखाटन करून निर्मिती मूल्यात मोलाची भर टाकणारे संतोष घोंगडे सर, पुस्तकासाठी अतिशय तळमळीने साथ देणारे आणि सहकार्य करणारे राम तरटे सर, माझ्यासोबत साहित्यिक प्रवास करणारी मैत्रीण अंजली कानींदे यांचे आणि प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्या प्रत्येकांचे ऋण व्यक्त करतानाच, हा जो काही लेखन प्रवास झाला तो माझ्या कुटुंबाच्या सहकार्याशिवाय कधीच शक्य झाला नसता. म्हणून या सर्वांच्याच मी कायम ऋणात राहिलं. वाचक या माझ्या साहित्यकृतीवर भरभरून प्रेम करतील या अपेक्षासह कडू गोड संवेदनांचा, भावनांचा कोलाज मी आपल्याला सुपूर्द करते.

**धन्यवाद !**

---

कोलाज शब्द फ्रेंच भाषेतून आलेला आहे. विविध गोष्टी एकत्र चिकटवून नवी कलाकृती करणे हा त्याचा सोपा सुलभ अर्थ. चिकटून राहणे आणि चिकटवून घेणे अर्थात् जोडून घेऊन, धरून राहणे हा 'स्त्री'चा गुणधर्म आहेच. आणि निर्मितीशी तर ती निसर्ग नियमा ने गुंतलेली असतेच. विविधता हे देखील स्त्री जीवनाचे महत्त्वाचे अंग.

मानवी अंतरंगात उसळणाऱ्या उसासणाऱ्या, आत साचून असणाऱ्या, थिजून गेलेल्या आणि कधी कधी उद्रेक होऊन बाहेर पडणाऱ्या, कधी प्रशांत लयीत जीवनाचा सुरेल राग ऐकवणाऱ्या अशा अनेक भावनांचा संमिश्र पट रुचिरा बेटकर यांनी कवितेतून मांडलेला दिसतो. वेगवेगळ्या भावनांना कवितेचे रूप देण्याच्या त्यांच्या या पहिल्या प्रयत्नास हार्दिक शुभेच्छा!

**डॉ.वृषाली किन्हाळकर**



माणसाच्या जगण्याला जेंव्हा जाग येते तेव्हां त्याला आतले आवाज ऐकू येऊ लागतात.... आणि हे आवाज जेंव्हा कवितेचे रूप घेऊन कागदावर अवतरतात तेंव्हा आपसूक ऐक मौलिक ऐवज तयार होतो. रुचिरा यांचा कोलाज भावनांचा हा कवितासंग्रह म्हणजे त्यांचा आतला आवाज आहे.

घेतलेला दागिना मिरवण इतकं सोपं नसतं असे जेंव्हा कवयत्री म्हणते तेंव्हा तो संदर्भ दीडदमडीच्या दागीन्याशी निगडीत नसतो तर अख्ख्य बाईपण याच ओळींनी तोलून धरलेलं असतं. हशोब काय ठेवणार या सारखी कविता आर्त होऊन एक प्रश्नचिन्ह उभे करते जे प्रश्नचिन्ह ताऊम्र जवाबाची तारीख शोधत उभे राहतं. अशी आशयगर्भ कविता रुचिरा आपल्या कोलाज भावनांचा या संग्रहाततून देतात.

आर्तता हा स्थायीभाव घेऊन येणारी ही कविता वाचकांना कातर करते हे मात्र खरे. कविता वाचताना ऐक समृद्ध अनुभव वाचकाना मिळतो. घुसमट व्यक्त करण्यासाठी रुचिराने निवडलेल्या शब्द या माध्यमावर तिची चांगली मांड आहे हे ध्यानात येते. इसाप प्रकाशन आणि दत्ता डांगे यांचा ब्रँड कवितेचे निर्मितमूल्य नेहमीप्रमाणेच ऐका उंचीवर नेऊन ठेवते.

**– मनोज बोरगावकर**



रुचिरा बेटकर यांचा 'कोलाज भावनांचा' हा संग्रह स्त्रीमनाची भावस्पंदने हळुवारपणे टिपणारा कवितासंग्रह आहे. जीवनाला सूक्ष्मपणे भिडणारी व सकारात्मक प्रतिसाद देणारी ही मानवाच्या दुर्दम्य आशावादाची कविता आहे. या कवितेचा प्रवास स्त्री व्यक्तिमत्त्वाकडून मानवी व्यक्तिमत्वाकडे होतो. त्यामुळे ही कविता जेव्हा प्रार्थनेचा स्वर उच्चारते तेव्हा ती प्रार्थना केवळ स्त्रीपुरती मर्यादित नसते तर ती अखिल विश्वाच्या कल्याणाबद्दल बोलते. 'मरगळत पडलेल्या आयुष्याला नवचैतन्य देईन म्हणते' हा कवयित्रीचा उद्गार यासाठी महत्त्वाचा आहे की तो केवळ विषाद व्यक्त करत नाही तर भावनांच्या कोलाहलाला विविध रंगांच्या कोलाज मध्ये परावर्तित करतो.

या कवयित्रीचे भविष्य हे उज्वल आहे, त्यांच्या भावी वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**– डॉ.पृथ्वीराज तौर**



कोलाज भावनांचा – वेळोवेळी आलेले अनुभव शब्दात व्यक्त करताना ज्या भावना झाल्या आणि कवितेतून जशा व्यक्त झाल्या, त्या जशाच्या तशा व्यक्त करणाऱ्या कवितांचा हा संग्रह आहे. कोलाज भावनांचा या शीर्षकातूनच हा आशय स्पष्ट होऊन जातो.कोलाज भावनांचा हा संग्रह लिहिणाऱ्या कवयित्री रुचिरा बेटकर यांना नैसर्गिकरित्या काव्यवृत्ति लाभली आहे ,हे निश्चितपणे म्हणता येते.

सोडून सावलीला पळणार तू कितीसा
केले मला वजा तर उरणार तू कितीसा

अशा प्रश्नवजा ओळी जेव्हा या कवयित्रीला मनातले गुपित सांगताना सहजपणे विचारता येऊ शकतात तेव्हा खात्रीने म्हणता येते की लय, मात्रा, वृत्त यांचाही वापर त्यांनी यापुढे गांभीर्याने करावा. भविष्यात आपल्या कवितेवर तंत्र म्हणून थोडे परिश्रम घेतले तर अनेक चांगल्या कविता त्यांच्या हातून निर्माण होत राहतील कारण विविध भावनांच्या आशयांना त्या अधिक प्रभावीपणे व्यक्त करू शकतील. हा सहज म्हणून दिलेला सल्ला असून या आधी ज्या कवितेतील ओळी इथे उद्धत केल्या आहेत ती पूर्ण कविता आशयसंपन्न आहेच.

सुप्रसिद्ध साहित्यिक सुरेश सावंत यांनी बेटकर यांच्या कवितेतील सामर्थ्य आणि वेगळेपणा समर्पकपणे व्यक्त केले असून नामवंत साहित्यिक देविदास फुलारी यांची पाठराखण कवित्रीच्या उज्वल भविष्याविषयी आशावाद व्यक्त करणारी आहे. ही पाठराखण सार्थ आहेच.

**– रवींद्र लक्ष्मीकांत तांबोळी**

# वाचकाच्या मनाला अंतर्मुख करणारी कविता कोलाज भावनांचा

प्रा.महेश मोरे

**कविता हा प्रांत गुंतागुंतीचा आहे.** मानवी मनाला दुःख,वेदना जेव्हा होतात. तेव्हा कवितेचा जन्म होतो. मानवी मन भावनांनी भरलेलं असतं. भावना म्हणजे तुमच्या, माझ्या मनातील विचार, अनुभव व संवेदना या सर्वांचा एकत्रित संगम होय. खऱ्या अर्थाने यातूनच कवितेचा जन्म होतो. कविता म्हणजेच भावना, अनुभव व कल्पनांना लयबद्ध मोजक्या सकस शब्दांत मांडणारा हा प्रकार आहे.आतून येणारा हुंकार होय. तसे पाहिले तर कवितेशी खेळणं तितकं सोपं नसतं. कवयित्री रुचिरा बेटकर यांचा 'कोलाज भावनाचा' हा संग्रह माझ्या हाती आला. स्त्री संवेदना व्यक्त करणारी एक सशक्त कवितेची अभिव्यक्ती म्हणजेच कोलाज भावनांचा समवाय होय.

कवयित्री रूचिरा बेटकर लहानपणापासूनच काव्यमैफिलीला येत असत. त्यांची आई रंजना बेटकर ह्या सामाजिक कार्यकर्त्या होत्या. डॉ. ललिता शिंदे,बोकारे ह्या दर महिन्याला एक काव्यमैफल ठेवत असत. गोष्ट १९९८ ची आहे. त्यावेळी या मैफलीत कवी शंकर वाडेवाले, डॉ.ललिता शिंदे, देवदत्त साने, महेश मोरे, शिवा कांबळे असे अनेक कवी या मैफलित असत. या मैफलीतचे निवेदन देवदत्त साने हे करीत असत. तेव्हापासूनच रुचिराच्या शब्दाला बाळकडू प्राप्त झाले. पुढे त्यांचं वाचन, चिंतन झाल्याने त्यांच्या हातून सकस कविता लिहिल्या गेल्या. कोलाज भावनाचा त्यांची ही फलश्रुती होय. शालेय जीवनापासूनच त्यांच्यावर शब्दांचे संस्कार होत गेले. पुढे महाविद्यालयात जीवनात त्यांनी आपल्या वाचनामुळे त्यांना दर्जेदार लिहिण्याची ओढ लागली. त्या लिहू लागल्या कवितासंग्रह प्रकाशित करण्याची घाई पण त्यांनी केली नाही. त्यामुळेही ताकदीची, सकस अशी कविता आली. काय असतात स्त्री जाणिवा, स्त्रियांचे दुःख, स्त्रियांच्या वेदना वाचकाच्या मनाला अंतर्मुख करणारी ही कविता मानवी मनाला भेडते. या कवितेला स्वतःची लय आहे शब्दांच्या नादमयतेतून वाचकाच्या मनाला स्पर्श करून ही कविता जाते. निसर्ग सोबती या कवितेत कवयित्री सहज लिहून जाते.

**रंग मातीचा वेगळा**
**तरी सुगंध साजरा**
**नाना उत्सव सोहळा**
**फुटे धान्याचाच झरा**

सृष्टीतील काही ऋतू रंग उधळीत असतात. मग सर्व रंग एक होतो. त्यातूनच अवघा रंग एक होतो .हा निसर्ग कमालीचा आहे. कवयित्री आशावादी आहे. आपण पाहतो कधी अतिवृष्टी, कधी आवर्षण पर्यावरणाचा समतोल राहिला. तर प्रश्न पाण्याचा सुटू शकतो . हा सर्व खेळ ऋतूच करीत आसतो. पर्यावरणाचा समतोल आपणाला जपून ठेवावा लागणार आहे. म्हणून कवित्रीला तिच्या मनात आशावाद निर्माण झालेला आहे. ही सृष्टी पुन्हा नव्याने कुणब्याला आबादी आबाद करेल.

एकांत सारख्या कवितेत कवयित्री आपल्या मनातल्या भावना मांडते

**कधी हासऱ्या कधी**
**कधी रुसव्या क्षणाने**
**जीव होतो हळवा**
**एकांतात कसं सोधू**
**मी स्वतःला**

शेवटी काहीच येत नाही हाताला नुसतच एक नाव पुरेसं आहे एकांतात राहायला..

आज जागतिकीकरणाच्या युगात आपणाला एकांत राहिला नाही. प्रत्येक जण कुठल्या ना कुठल्या क्षेत्रात मग्न झाला आहे. आपल्या स्वतःच्या धुंदीत वावरत आहे. असे वावरत असताना त्याचं त्याला नाव पुरेसं आहे. कधी आनंद, कधी दुःख जीवनात हसरा, रुसवा क्षण येतात.. शेवटी हाताला लागत काहीच नाही. ही मुक्तछंदातील कविता सहज आकृती बद्ध होत जाते .या कवितेला एक आंतरिक लय आहे .कविता मुक्तछंदातली असली तरी तिला सहज लय प्राप्त झाली आहे. भूक या कवितेत कवयित्री प्रकर्षाने लिहून जाते.

**चांदण्याचं रोज तुरळक**
**टिम टिम चमकत जाणवते**
**पण तू सोबत असलास की, त्या जरा**
**जास्त टीमटीमल्या सारख्या वाटते...**
**बस एवढंच!**

संग्रहातील काही कविता प्रेम भावना व्यक्त करीत आहेत. आज कुणाची तरी सोबत असणे फार गरजेचे आहे. कवयित्री म्हणते तू सोबत असायला हवा की खरोखरच आपलं आयुष्य वाढेल. तेव्हा जीवनात शितल चांदणे आनंद देत जाईल.

कवयित्री सर्व रंग उधळीत जाते. त्या रंगात भक्तीरस शोधत असते.भेटला विठ्ठल

**तुझ्या नामाच्या गजरात भेटला विठ्ठल**
**तुझ्या रंगात रंगुनी भेटला विठ्ठल**

भक्तीरसात केलेली कविता मनाला आल्हाद आनंद देते.

कवयित्री आपलं स्वत्व सोडत नाही. आपल्या साथीला जो आहे. त्यास ती विठ्ठलाची उपमा देते. तो सुखदुःखाला पाठीराखा होतो. तो ओंजळीतल्या पाण्यातही विठ्ठलच भासतो. भोळ्या, भाबड्या चेहऱ्यामध्येही कवित्रीला विठ्ठल दिसतो .एक भाकर जरी असली, तरी अर्धी भाकर देणारा तो विठ्ठल आपला होतो. अशा या क्षणाक्षणाला विठ्ठल भेटल्यावर प्रेमाच्या भक्तीरसात सर्वदूर विठ्ठल दिसत असतो. चित्रपट सारख्या कवितेत कवयित्री मुक्तछंदातून आपल्या भावना व्यक्त करते.

**कधी कधी मन**
**असेच शिरते**
**भूतकाळाच्या गुहेत**
**अन्.. आठवते**
**मागील क्षणाच्या**
**आठवणी**
**माझ्यावर झालेल्या**
**सुखदुःखाचा**
**चित्रपट..**
**तो पाहताना**
**पाणावतात**
**अजूनही डोळे**
**आशातच..**
**होते रील कट आणि मी**
**वर्तमानकाळाच्या क्षितीजावर येते...**

कवितेचा जीव छोटा आहे .पण आशय फार मोठा आहे. एखांदी तिनसे ते चारसे पानाची कादंबरी लिहिता येईल. एवढा मोठा आहे.

जगाचा पोशिंदा शेतकरी आज त्याची अवस्था काय झाली. यावर व्यवस्थितला कवयित्री थेट प्रश्न विचारते. त्या पोशिंदाच्या जगण्याचं मर्म सांगते.

**पोशिंदा**
**जगाचा,**
**भुकेला ना धर्म**
**कोणते ते कर्म, तू भोगती..**
किंवा
**पोशिंदा जगाचा तूच अन्नदाता**
**जाण होई कव्हा, शासनाला...**

आपल्या भारतात दररोज दहा शेतकरी आत्महत्या करीत आहेत ही अंतहीन कहानी आहे. सर्वांना जगवणारा शेतकरी तोच कंगाल होत आहे .याची खंत कवी मनाला सातत्याने बोचत राहते. सरकारला त्याची कीव यावी सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे. असा आशावाद कवयित्रीने पेरला आहे.


कोलाज या कवितेत कवयित्री आपल्या मनातील भावभावना व्यक्त करते.

**कोणत्याच भावनेच्या गावी**
**जाणे जमले नाही**
**कोलाज भावनेचा शब्दात**
**सामावली नाही...**

आपलं जगणं कसं आहे. खरे तर ते दुःखमय आहे. डोंगराएवढे दुःख आहे. म्हाताऱ्या झालेल्या डोंगर एवढं मोठं दुःख. कुठे कोणाला सांगावे, म्हणून तर गौतम बुद्धांनी शांतीचा ध्यास नेहमी धरलेला आहे .बुद्धांच्या जगण्याचं तत्वज्ञान ज्याला कळाले. तोच दुःखाला पचू शकतो कवित्रीने अतिशय सूक्ष्म असे बारकाव्याने टिपले आहेत. कवित्रीने त्या शब्दातील सर्वच रंग, गंध शब्दाच्या मुठीतआलगद पकडले आहेत. साधी, सोपी शब्दकळा सर्वसामान्य वाचकाला समजेल अशी आहे. कवयित्रीला भाषाभान आहे. अशी ही उत्तम शब्दातून उत्तम रचना साकार झाली आहे.

डॉ. सुरेश सावंत यांची प्रस्तावना व ज्येष्ठ साहित्यिक, कवी देवीदास फुलारी यांची पाठराखान या संग्रहास लाभली आहे. इसापचे मालक दत्ता डांगे यांनी उत्तम मांडणी आणि बांधणी केली आहे. संतोष घोंगडे यांनी सुंदर असे मुखपृष्ठ रेखाटले आहे. त्यामुळे हा संग्रह वाचनीय झाला आहे. कवयत्री रुचिरा बेटकर यांना पुढील लेखणीस मनःपूर्वक शुभेच्छा.






## ओंजळीतल्या काव्यफुलांचा मोहक दरवळ म्हणजे कोलाज भावनांचा

गंधभारल्या वेदनांची गुलाबी मुकआर्त... गहिवरल्या,भाबांवल्या शब्दफूलांची अवखळ साद... ओंजळीतल्या काव्यफुलांचा मोहक दरवळ, श्वासाच्या हिंदोळ्यावर अलवार झुलतांना हृदयातील प्रेमअतुर पाखरांची प्रणयी कुजबुज...विरह,मिलन,ओढ,आणि आहे त्या परिस्थीतीला स्विकारत आयुष्य जगण्याची नवी उम्मेद...आणि स्वप्नांनी भरलेलं आभाळ कवेत घेण्याची धमक,शब्दांची ओंथबलेली नक्षी म्हणजे कवयित्री रूचिरा बेटकर यांची नवनिर्मीती असलेला कोलाज भावनांचाकवितासंग्रह!वाचतांना त्यांच्या शब्दसामर्थ्यांची भुल जडत जावी आणि मोरपंखीऋतुंनी अलवार कुस बदलतांना कविता यौवनात यावी...आणि प्रग्लभता,कुलाची शालिनता अंगभर पांघरुन ती रसीकांच्या मनात कायम वसावी!

प्रत्येकांनी संग्रही ठेवावा असा हा काव्यसंग्रह आहे.यातील प्रत्येक कविता मनाचा ठाव घेते.जीवनातील प्रत्येक आठवण त्यांनी शब्दबध्द करत कवितारुपी कॅनव्हासवर रेखाटली आहे.त्यांच्या शब्दातुन अमृतरसाचे कुंभ बरसावेत आणि वाचकांना तृप्त करुन जावेत...शब्दांशी नातं घट्ट होतांना आपल्या लेखणीला उत्तोरोत्तर बळ मिळो एवढीच प्रांजळ सदिच्छा!

रुपाली वागरे-वैद्य



# अनुभव-अनुभूती यांच्याशी भावनांची नाळ जोडलेला काव्यसंग्रह 'कोलाज भावनांचा'

निशा डांगे नायगावकर

**अनुभव-अनुभूती यांच्याशी भावनांची नाळ** जोडलेला काव्यसंग्रह अर्थात 'कोलाज भावनांचा'! हा कवितासंग्रह कवयित्री रुचिरा बेटकर मराठी साहित्य विश्वात नव्याने घेऊन आली आहे. कवयित्रीचा हा पहिलाच काव्यसंग्रह असला तरीही लिखाणात अनुभवाने आलेले अनुभव समृद्धपण आहे. दुभंगलेल्या काळजाचे विखुरलेले तुकडे भावनांनी सांधून त्याचा सुंदर कोलाज या काव्यसंग्रहात रेखाटलेला दिसतो. कवयित्री जेवढी संवेदनशील आहे तेवढीच चिंतनशील आहे. या संग्रहातील कविता वाचकाला भावनिकतेकडून आत्मचिंतनशीलतेकडे घेऊन जातात. कवयित्रीच्या शांत, गहिऱ्या कव्यक्तिमत्वाचा प्रभाव त्यांच्या लेखनातून जाणवतो. कवयित्री आणि कवयित्रीचं कवित्व हे दोन्ही आरसा आणि आरशातील स्वच्छ, प्रसन्न आणि आत्मतेजोवलयीत प्रतिबिंब याचा उत्तम नमुना आहे.

कविता लिहिण्याची उपजत प्रतिभा असणे हे नक्षत्राचे देणे आहे. ही उपजत प्रतिभा अनेक मनामनांत नांदत असते. देह कितीही बंधनात राहू शकतो परंतु मन मात्र संपूर्ण ब्रह्मांडात मुक्तपणे विहरत असते. डोक्यातील विचारांचा कल्लोळ आणि डोळ्यांत साठलेली स्वप्नं, मनाच्या भाव भावना, कल्पनांची गगन भरारी हे सारं काही शब्दांतून अवतरत असते. हे शब्दांतून रेखाटलेलं मनाच्या सृजन सोहळ्याचे सुंदर चित्र म्हणजेच कविता!

कवयित्री रुचिरा बेटकर साहित्य, समाजकार्य तसेच शिक्षण या तिन्ही क्षेत्रात कार्यरत आहेत. तिन्ही क्षेत्रात त्यांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांना तिन्ही क्षेत्रात मानाचे पुरस्कार प्राप्त आहेत. नागपूर येथील सेवा सदन माहेर मेळावा येथे आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. साहित्यिक कार्यासाठी दिल्ली येथे राज्यपाल आणि विदेशातील मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले फेलोशिप हा पुरस्कार देण्यात आला आहे. साहित्यिक लिखाणासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समाज भूषण पुरस्कार देण्यात आला आहे. संत कबीर समता परिषद यांच्याकडून महाराष्ट्रभूषण व जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. शासकीय, निमशासकीय अधिकारी, कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई सांस्कृतिक विभाग नांदेडच्या वतीने मातोश्री रमाई जयंती महोत्सवानिमित्त माता रमाई पुरस्कार

कवयित्रीचे साहित्यिक क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. विविध मासिक अंक, दैनिक अंक यात सतत संवेदनशील लेखन त्या करत असतात.

कवयित्री रुचिरा बेटकरच्या केवळ यांच्या मनातील भावभावनांचा उचंबळ 'कोलाज भावनांचा' या संग्रहात वाचायला मिळत नाही तर कवयित्रीने परकाया प्रवेश करून इतरांच्या भावनांनाही अतिशय संवेदनशीलतेने शब्दबद्ध केले आहे. अंतरंगाचे अनेक कंगोर आणि विविध पैलू त्यांनी मुक्तपणे रेखाटले आहेत. त्यांच्या काव्यलेखनात आईवडिलांप्रति कृतज्ञता, अपार आदर दिसून येतो. कवयित्रीने अपर्णपत्रिकेत आईवडिलांना अतिशय कृतज्ञतापूर्वक हा काव्यसंग्रह अर्पण केला आहे. कधी प्रेम, कधी विरह, कधी प्रणय तर कधी सामान्य माणसाचे दुःख, त्यांच्या समस्या, तर कधी संदेश तर कधी बोध सुद्धा रुचिरा बेटकर यांच्या कवितेतून वाचकांना वाचायला मिळतो.

**पावसाळी थेंबाचे दव जगावेसे वाटते**
**ओठांवरची ओल मनात जपावेसे वाटते**
**वाट वाकडी करून तुला भेटावसे वाटते**
**नजरेत तुझ्या नजरेने उतरावेसे वाटते**

पावसाळा प्रेमात ओतप्रोत भिजलेल्या मनाचाही ऋतू आणि विरहात होरपळलेल्या जिवाचाही आवडणारा ऋतू. कवयित्रीला पावसाळ्याची भुरळ न पडली तर नवलच! पावसाचे टपोरे थेंबाचे दव अलगद टिपावेसे वाटतात. ओठांवरची ओल मनात कायम जपावीशी वाटते. कधी आपली सरळ वाट सोडून वाकड्या वाटेने चालावेसे वाटते आणि मनाला जे हवे ते करावेसे वाटते. प्रियकराला भेटावेसे वाटते केवळ नजरेनेच त्याच्या नजरेत उतरावेसे वाटते. तारुण्यसुलभ प्रेममय भावना कवयित्रीने उत्तमरीत्या कवितेतून मांडल्या आहेत. सुंदर द्वीपदी कवयित्रीने लिहिली आहे. एकांत या कवितेत स्वतःच्या धुंदीत, स्वतःच्या तंद्रीत वावरणारी एक वेगळीच कवयित्री आपल्याला भेटते.

**नुसतंच एक नाव पुरेसं आहे**
**स्वतःच्या धुंदीत वावरायला**
**नुसतीच एक आठवण पुरेशी आहे**
**अख्खं आयुष्य काढायला..**

कवयित्री द्वीपदी, पारंपरिक कविता जितक्या तन्मयतेने आणि ताकदीने लिहिते तितक्याच ताकदीने मुक्तछंद लिहिते. अगदी मोजक्या आणि नेटक्या शब्दात महत्वपूर्ण आणि प्रभावी मुक्तछंद या काव्यसंग्रहात आपल्याला वाचायला मिळतात. वरील मुक्तछंदात कवयित्री एकांतात स्वतःचा शोध घेऊ पाहते. स्वतःच्या तंद्रीत जगत असताना साऱ्या विश्वाचा क्षणभर तिला विसर पडतो. स्वतःच्या धुंदीत वावरण्यासाठी एकांताचं फक्त नाव पुरेसे वाटते. संपूर्ण आयुष्य जगण्यासाठी तिला एक आठवण पुरेशी वाटते परंतु या एकांतात स्वतःचा शोध घेत वणवण भरकटल्यावर तिला लक्षात येते की आपल्या हाती काहीच लागलं नाही. शेवटी फक्त एकांत .. एकांत

**बाईपणाचं शरीर, रोज रात्रीला झिजतं**
**देह देत आहुतीला, जरा उपाय मागतं**

बाईपणाचं जगणं सोपं नसतं. दिवसभर घरंदजपणाचा देखणा डोलारा मिरवत जो मुखवटा धारण करते बाई त्या मुखवट्यामागे तिच्या काळजातल्या काळीजवेणा ती कुशलतेने लपवत असते. रात्रभर सोसलेल्या दुःखाचा सोस तिला जड होतो तरीसुद्धा एक उसासा ही ती मोकळेपणाने टाकू शकत नाही की एक मोकळा श्वासही भरून घेऊ शकत नाही. रोज रात्रीला झिजणारा तिचा देह थकलेला असतो. थकलेल्या देह या रोजरोजच्या आहुतीसाठी काहीतरी उपाय मागत असतो परंतु निरूपाय असलेलं जिणं बाईच्या वाटेला आल्यावर 'आलिया भोगासी असावे सादर!' असे म्हणत ती स्त्री जणांचे भोग भोगत असते. या कवितेत कवयित्री सकळ स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते त्यांचे दुःख, त्यांच्या वेदना मांडतांना ती भावूक होते. एक स्त्री स्त्रीचे दुःख काळजातून मांडताना येथे दिसते.

**नाकावरचा एकेक मोती तोलायला**
**आणि नथीचा नखरा करायलाही**
**बाईच व्हावं लागतं!**
**कारण घेतलेला दागिना,**
**मिरवणं इतकं सोपं नसतं!**

खरंय समाजाच्या चालीरीती आणि प्रथा, परंपरेने स्त्रीला जखडून ठेवले आहे. प्रत्येक सौभाग्याचा दागिना तिला तिची जबाबदारी जाणवून देत असतो. तिच्याभोवती मर्यादा आखत असतो. सर्व मर्यादा, सर्व जबाबदाऱ्या केवळ स्त्रियांनाच? पुरुषांच्या अंगावर कुठे आहेत दागिने त्यांना बांधून ठेवणारे? यांच्याभोवती मर्यादा आखणारे? तरीही स्त्री हे सौभाग्याचं लेणं आयुष्याचं लेणं समजून आयुष्यभर सांभाळत असते तेही गोड मानून.

**रुसलेली कविता**
**एकदा,**
**माझेच शब्द माझ्यावर रुसले**
**मनातल्या रुजणाऱ्या बीजात**
**खोल रुतून बसले**
**शब्द बीजांना घेऊन**
**निसर्गाकडे गेले रुसलेल्या शब्दात**
**उगीच अडकून बसले**
**फुलांना बघूनही शब्द काही हसेनात**

प्रत्येक कवी, कवयित्रीच्या आयुष्यात ही वेळ अनेकदा येते जिथे शब्द रुसतात. कितीही उपाय केले तरीही ते हसत नाहीत अर्थात लिहिण्यासाठी नवसृजन काही लेखणीतून प्रसवत नाही. अशावेळी कवयित्रीचे शब्द निसर्गाकडे जातात आणि निसर्गाच्या सानिध्यातही कवयित्रीचे शब्द रुसवा सोडत नाहीत. कवयित्री हताशपणे म्हणते माझे शब्द माझ्यावरच रुसले. रुसलेल्या शब्दांचा रुसवा सोडवताना कवयित्रीचे हृदय विव्हळते. कवयित्रीचे विव्हळणारे हृदय पाहून शब्दांना तिच्या वेदनेची जाणीव होते आणि मग शब्द त्यांचा रुसवा सोडतात आणि नेमक्या त्याच वेळी कवयित्रीला तिची कविता सापडते. ही अशी हरवलेली कविता जेव्हा सापडते तेव्हा प्रत्येक कवी, कवयित्रीच्या आनंदाला पारावार उरत नाही. अप्रतिम मुक्तछंद लिहिला आहे कवयित्रीने.

'कोलाज भावनांचा' या रुचिरा बेटकर यांच्या काव्यसंग्रहात एकूण ८० कविता आहेत. विषयाचे नाविन्यपूर्ण आणि वैविध्य कवितेत आहे. निसर्ग रचना ते मानवी जीवनाचे अनेक पैलू उजागर करणाऱ्या कविता या संग्रहात आहेत. कवयित्रीच्या अनुभव समृद्ध जीवनाचा परिपाक या संग्रहात आहे. कवयित्रीच्या वाचन व्यासंग आणि कार्यक्षेत्राने त्यांच्या लेखनशैलीला समृद्ध केले आहे. पहिल्या काव्यसंग्रहातून कवयित्री उत्तमरीत्या व्यक्त झाली आहे त्यासाठी कवयित्रीचे खूप खूप अभिनंदन आणि कौतुक!

'कोलाज भावनांचा' हा रुचिरा बेटकर यांचा काव्यसंग्रह नांदेडचे सुप्रसिद्ध लेखक, प्रकाशक दत्ता डांगे यांच्या इसाप या प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. पुस्तक बांधणी अप्रतिम झाली आहे. अतिशय देखणे व समर्पक मुखपृष्ठ चित्रकार संतोष घोंगडे यांनी साकारले आहे. कवयित्रीचा देखणा चेहरा त्यावरील निरागस भावमुद्रा आणि तिच्या मनातील भावभावनांचा कल्लोळ रेखाटने हे नक्कीच चित्रकारासाठी कठीण टास्क होते. ते त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल चित्रकार संतोष घोंगडे यांचे खूप खूप अभिनंदन आणि कवयित्रीचेही या सुंदर कल्पनेसाठी खूप खूप कौतुक! कवयित्री रुचिरा बेटकर यांना पुढील लेखनासाठी अनेक शुभेच्छा!

**शुभं भवतु!**




# अव्यक्त ओठाआड दडलेल्या प्रेमभावनेचा हुंकार कोलाज भावनांचा

**एक संवेदनशील आणि निर्भीड कवयित्री** म्हणून रुचिरा बेटकर यांची एक वेगळी ओळख आहे.' कोलाज भावनांचा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह आहे . नांदेड येथील इसाप प्रकाशनाने तो प्रकाशित केला. यामध्ये प्रेम, विरह, निसर्ग, शेतकरी, समाजसुधारक आणि वर्तमान समाज इ.अशा विविध विषयावर आधारित एकूण ८० कविता आहेत.९६ पृष्ठाच्या या काव्यसंग्रहाचे अत्यंत समर्पक, सूचक आणि बोलके मुखपृष्ठ कलावंत संतोष घोंगडे यांनी तयार केले आहे. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी डॉ. सुरेश सावंत यांनी प्रास्तावनेतून या कवितेचा अर्क नेमकेपणाने मांडला तर लेखक देविदास फुलारी यांनी मलपृष्ठातील मजकुरातून कवयित्रीच्या मनातील भावनिक आंदोलने नेमकेपणे हेरली आहेत. आई-वडिलांच्या नावाची चादर जेव्हा आयुष्यातून निघून जाते. तेव्हा आयुष्यातील प्रत्येक सकाळ जबाबदारीची जाणीव करून देते या पहिल्या पानावरील अर्पण पत्रिकेने वाचक अस्वस्थ होतो पुढे ही अस्वस्थता या काव्यसंग्रहाच्या पानापानातून वाहत राहते.

'कोलाज भावनांचा' या काव्यसंग्रहातील कवितांचा प्रवास हा प्रेम, निसर्ग, आत्ममग्नता, सामाजिक जाणीव व समाजसुधारकांचे विचार या दिशेने जाताना दिसतो. मनात कुठलाही आडपडदा न ठेवता अत्यंत निर्भीडपणे ओठाआड दडलेल्या प्रेमभावनेचा मुक्त संचार या कवितेतून खळखळत वाहत राहतो . खरे तर कलेची व्याख्या करताना असंख्य विचारवंतांनी आपली मते मांडली. त्यापैकी 'कलेसाठी कला' हे एक मत आहे. वर्डस्वर्थ, एस.टी कोलरीज, पी.बी शेली, जॉन किटस आणि बायरन या लेखकांनी आपल्या मनातील तरल भावना बिनदिक्कतपणे मांडली. प्रेम भावना व्यक्त करताना भारतीय साहित्यिकांनी आपल्या ग्रंथात राम - सीता, कृष्ण - राधा , महादेव -पार्वती, अर्जुन- सुभद्रा इत्यादी महापुरुषांचा आधार घेऊन ती प्रेमभावना पवित्र पातळीवर मांडली आहे. भक्तीच्या रूपाने ही भावना महानुभाव, वारकरी, पंडिती, शाहिरी या संप्रदायाने ती अधिक गतिमान केली. इंग्रज काळातील साहित्याने व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व दिले. त्याचा परिणाम कवी त्यांनी लिहिली आहे . माझ्यासाठी कविता म्हणजे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर ती आत्म्याची भाषा आहे. जेव्हा शब्द अपुरे पडतात तेव्हा कविता जन्माला येते. हे या काव्यनिर्मितीचे प्रयोजन आहे.

स्त्री मनाचे वेगवेगळे पदर या कवितेतून उलगडतात. या कवितेत निखळ प्रेमभावना आहे. निरागस मन आहे. भाबड्या, अल्लड, अवखळ तरुण मनातील सल आहे. विरह तर कधी स्त्री मनाची मानसिक कुचंबना व घुसमट आहे. कवयित्री रुचिरा बेटकर यांनी आयुष्याच्या वाटेवरील अनुभवांच्या सिरीयसपणे काढलेल्या ह्या नोट्स आहेत. मुखपृष्ठावरील त्यांच्या डोळ्यातील विविध भावछटा ह्या नव्या कोलाजला जन्म देणाऱ्या आहेत. कविता म्हणजे शब्दांचा खेळ नसतो तो मानवी भावनांचा भावनिक जागर असतो. कविता म्हणजे केवळ टिंब, रेषा, अनुस्वार, मात्रा, काना किंवा वेलांटी नसते. ती हृदय आणि भावनांची शिदोरी असते. म्हणून तिला सार्वत्रिक व्यापकपण लाभते.

या कवितेतील शब्द, आशय, कवितेची शीर्षक, त्यातील प्रतिमा ह्या खूप सूचक आहेत. या कवितेत डोळ्यांची भाषा, देहबोली, नायिकेच्या मनातील प्रेमभावना, विरहभावना, आत्ममग्नता नेमकेपणे हेरली आहे. तुझ्या उबदार कुशीत शिरावेसे वाटते (ओल), येतोस समोरी जेव्हा, हृदयाची धडधड होते (पडझड), मिठीत यायचंच तर असा ये की दुजेपणाचे भान सुटावं (मिठी), प्रीतीचे असे दररोज निरोप धाडावे इशाऱ्यानी (यौवन), सोडू नको मिठी ही, तू थांब ना जरासा, माझ्या मनात काही भलते अजून आहे (तू थांब ना जरासा), चल तुझं सर्व मान्य मला पण भावनेची चिरफाड नको ! (वेल) इत्यादी असंख्य कवितेतील ओळींमधून नायिकेच्या मनातील प्रियकराबद्दलची प्रांजळ प्रेमभावना व्यक्त झाली आहे. या कवयित्रीने काही कवितेतून बाईपणाच्या जबाबदारीचे व ओझ्याचे चिंतन केले आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, विठ्ठल आणि बुद्ध यांच्या कार्याला नमन केले आहे. या काव्यसंग्रहात बाईपणाच्या वनव्यात भाजणारी स्त्री येते तर कधी रुढी परंपरेने दबलेली स्त्रीची वेदना प्रकटते म्हणून ही कविता केवळ



केशवसुत, रविकिरण मंडळ या काळातील कवीमध्ये दिसतो. पुढे वसंत बापट , भा.रा.तांबे, बा.भ.बोरकर, मंगेश पाडगावकर, साठोत्तरी प्रवाहातील विविध कवी, इसवी सन २००० नंतरचे कवी, कवयित्री यांनी पारंपारिक बंधने झुगारली आणि मनातील वास्तव भावनेला वाट मोकळी करून दिली. वर्तमान काळातील कवयित्री रुचिरा बेटकर ह्या त्यापैकी एक आहेत. मनात कोणताही अडसर न ठेवता निर्भीडपणे त्यांनी काव्य लेखन केले आहे.

मराठी साहित्यात 'मी ' आणि 'तू ' भोवती फिरणारी प्रेम कविता उदंड लिहिली गेली आहे. यामध्ये बहुतांश हे कवीच आहेत. कवयित्री ह्या संख्येने कमी आहेत त्याची कारणे अनेक आहेत . आजतागायत आपण पुरुषाच्या नजरेतील स्त्रीची प्रतिमा वाचली प्रेयसीच्या भेटीसाठी व्याकुळ होणारा प्रियकर पाहिला आहे पण 'कोलाज भावनांचा' या काव्यसंग्रहातील कवितेतून प्रियकराच्या ओढीने व्याकुळ होणारी प्रेयसी दिसते. हे या कवितेचे वेगळेपण

प्रा.डॉ.व्यंकटी पावडे

आहे. हृदयामध्ये भावना व मेंदूमध्ये वेदना असली की अस्सल कवितेचा जन्म होतो. मग ही अस्सलता सर्व बंधने झुगारते. रूढी, प्रथा, परंपरा, रितीरिवाज, संस्कृती यांच्या बुरसटलेल्या बंधनांनी स्त्रीचे अस्तित्व आणि स्वातंत्र्य धोक्यात आले आहे. या सर्व बंधनाच्या तळाशी खोल गाळात रुतून बसलेली ही स्त्री विचारस्वातंत्र्याच्या अधिकाराने या कवितेने प्रकट केली आहे. स्त्री म्हणून तिलाही पुरुषासारखे मन, भावना, विचार आहेत. मग तिला पुरुषाच्या बरोबरीने स्वातंत्र्य का नको हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा सवाल ही कविता वाचताना लक्षात येते.

'कोलाज' या शब्दाचा अर्थ खूप अर्थवाही आहे. फ्रेंच शब्द 'कॉलर' वरून तो आला आहे. चिकटवणे किंवा एकत्र करणे हा त्याचा अर्थ. रंग, प्रतिमा, पोत आणि मजकूर यांच्या साह्याने विविध तुकड्यांचे एकत्रीकरण करून सुंदर प्रतिमा तयार करणे म्हणजे 'कोलाज' होय. कवयित्री रुचिरा बेटकर यांनी त्यांच्या मनातील विविध भावाआंदोलनांना एकत्रित केले व या कोलाजातून काव्यनिर्मिती केली. मनातील अबोल राहिलेल्या भावनांचा निचरा म्हणजे त्यांची कविता होय. ही कविता अल्लडपणातून अजिबात आली नाही. कारण त्यांच्या घराण्यात कविता ही पारंपरिकपणे चालत आली आहे त्यांच्या वडिलांनी कविता अगोदर लिहिली. ती वाचून, समजून नंतरच्या पिढीची कविता प्रेमाच्या दिंडी भोवती फिरणारी नाही तर ती समाज, शेतकरी, स्त्रीच्या अबोल मनाची व्यथा मांडणारी आहे.

संभ्रमात हरवून गेले ओळखीचे रस्ते
नको ते आयुष्याचे भान पुन्हा एकदा
**(पुन्हा एकदा)**

आता ठेवते खाली जरा मी लेखणी
त्सुनामीलाही थोडासा विसावा लागतो
**(विसावा)**

अंतर्मनाची खोली आवराया घेतली
नुसतीच जखमानी भरलेली दिसली
**(खोली)**

एक आयुष्य जगण्यासाठी श्वास उसने मागवले
नातं समजून घेण्याइतपत मार्जिन मिळवली नाही
**(कोलाज)**

अशा काही वैचारिक भान देणाऱ्या कवितेतून या कवयित्रीची वैचारिक उंची, खोली आणि रुंदी किती व्यापक आहे हे लक्षात येते. आयुष्याचे ऑडिट करणारी ही कविता वादळाशी, संकटाशी, तूटलेल्या नात्याशी, जगण्यातील निरर्थकतेशी भिडणारी आहे. सफल प्रेमापेक्षा विफल प्रेमाची कथा सांगणारी ही कविता निराशावादी नाही. ती सकारात्मक व आशावादी आहे. ही कविता जगण्यावर प्रेम करणारी व मानवी जीवनाला सुंदर स्वर्ग बनू पाहणारी आहे. म्हणून या कवयित्रीचे जीवनावर प्रेम आहे .

'तरीपण जगलच पाहिजे, जीवनाचे रंग रूप पाहिलेच पाहिजे'(समाज), या ओळीतून तो आवाज अधिक उंचीवर जातो. म्हणून ही कविता वाचकांच्या मनाचा ठाव घेते.

प्रियकराच्या ओढीने व प्रेमाने लुब्ध झालेली ही कविता कुठेही अश्लील होत नाही. या कवितेत एक संस्कारी मर्यादापालन आढळते. प्रेमातील अपयशाने ती जीवाचे बरे वाईट करणारी नाही तर जीवनाचा अर्थ समजून घेऊन बुद्धाच्या करुणेकडे निघालेली आहे. म्हणून ही कविता एका वेगळ्या मार्गाने निघालेली व मराठी काव्य परंपरा समृद्ध करणारी एक संपन्न कविता आहे . निश्चितच या कवितेचे वाचक, रसिक, कवी, लेखक व विद्यार्थी स्वागत करतील ही अपेक्षा आहे. म्हणून संवेदनशील मनाच्या कवयित्री रुचिरा बेटकर यांना माझ्याकडून भावी लेखनासाठी खूप खूप शुभेच्छा.

# आंतरिक स्पंदनांच्या नितळ भावनांचा कोलाज



**कवयित्री रुचिरा बेटकर यांचा 'भावनांचा कोलाज'** हा पहिला कवितासंग्रह आज प्रकाशित होतोय. निसर्ग, माणूस, जीवन, जगणं, नाती, प्रीती, विरह, वेदना, संवेदना अशा आंतरिक स्पंदनांच्या भावनांचा हा मनमोहक कोलाज कवयित्रीने साकारला आहे. अवती भवतीच्या अनुभूतींना सहज लयीत रुचिरा बेटकर या संग्रहातील कवितेतून व्यक्त होतात. हे सहज सुगमपण वाचकांना स्वतःत डोकावून बघायला लावणारे आहे.

एकूण ऐंशी कविता असलेला हा भावनांचा कोलाज म्हणजे जणू कवयित्रीने स्वतःला सोलत सोलत जगलेल्या जीवनाचा सारांशच आहे. आज मानवी जीवन मोठ्या हलहलातून संक्रमित होत असताना, वेदनांची काहिली साहत शब्दांना पंख देणारी ही कविता आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

शीर्षक कविता 'कोलाज' वाचून वरील विवेचनाची खात्री होऊ शकेल. कवयित्री लिहिते,

**'स्वतःशीच आपुलकीची कला कधी साधली नाही**
**जगून घेतली जिंदगी जरी मीच चांगली नाही'**

सर्वस्व समर्पित झाल्यानंतरही जेव्हा सोबती पलायन स्वीकारू जातो, तेव्हा आपल्या अभिन्न जगण्याची तारेवरची कसरत अशी जाब विचारते. मी तुझी सावली असताना, कुठवर पळशील? असा सवाल करून निरुत्तर करते.

एका कवितेत 'तुझ्या उबदार कुशीत शिरावेसे वाटते, डोळ्याची पापणी पांघरावेसे वाटते' अशी मीलनाची भावोत्कट अवस्था व्यक्त करणारी कवयित्री दुसऱ्या कवितेत 'नुसतीच एक आठवण पुरेशी आहे, अख्खं आयुष्य काढायला' अशी समंजस भूमिका मांडते. म्हणजे सगळीच स्वप्नं साक्षात होणारी नसतात, नसू शकतात ही वास्तवाची जाणीव हा समंजसपणा देत असते. आतली वादळे स्वीकारूनच हा शकट ओढायचा असतो ही शहाणीव देणारी ही 'एकान्त' कवितेतील भावना आहे.

भावनांशी एकरूप झालेल्या या संग्रहातील बव्हंशी कविता या प्रीतिप्रेम व्यक्त करताना तरल अनुभूतींचा साक्षात उभं करणाऱ्या आहेत.

आणि तो मिरवायलाही तितकीच धमक लागते, असंही वाटून जातं.

एकूणच भावनांचा कोलाज या पहिल्याच कवितासंग्रहात कवयित्री रुचिरा बेटकर यांनी आश्वासक कवितेची वाट धरल्याची खात्री पटते. संग्रहातील प्रत्येक कवितेतील लय याची आपणास साक्ष देणारी आहे. काही कविता या उत्कृष्ट गझला आहेत तर मुक्तछंदातील कवितांतयी सुंदर लय आहे.

सर्वस्पर्शी चित्रकार कवी संतोष घोंगडे यांचे बोलके मुखपृष्ठ लाभलेल्या या संग्रहाची पाठराखण प्रसिद्ध कवी देवीदास फुलारी यांनी केली आहे तर साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त प्रसिद्ध बालसाहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी संग्रहातील कवितेला न्याय देणारी प्रस्तावना लिहून वाचकांना एक पायवाट घालून दिली आहे. इसाप प्रकाशनाची नेहमीप्रमाणे दर्जेदार निर्मिती प्रकाशक दत्ता डांगे केली आहे. उर्वरित न्यायनिवाडा वाचकांसाठी ठेवून नव्या संग्रहाचे अभिनंदन आणि कवयित्रीच्या पुढील लेखनसाधनेस शुभेच्छा!

सुखदुःखाच्या या ऊन पावसाच्या लपंडावात हाताच्या ओंजळीतून सगळं सुटून जातानाही स्वतःला असं न्यायाच्या तराजूत तोलता येणं सोपं नसतं. भावनांशी इमान राखलं तरच अशी नेक कविता लिहिता येते. स्वतःतील उणं नितळतेनं अभिव्यक्त होतं तेव्हा तो कोलाज अधिक ठसठशीतपणे वाचकांना भावणारा होतो.

'मी काय म्हणते' या कवितेत 'ओंजळभर दुःख घेऊन, निळंशार सुख देईन' असं आकाशव्यापी रूप घेणारी कविता, 'मनातले गुपित' मध्ये साथीदाराच्या वर्तनाला प्रश्नांकित करून स्वतःच्या सजग ठामपणाची साक्ष देते.

**सोडून सावलीला पळणार तू कितीसा**
**केले मला वजा तर उरणार तू कितीसा**

'स्पर्श मखमली' या कवितेतील सुरुवातीच्या 'जरा पाऊस येऊ दे तुला भेटायला येते, शहाऱ्यांच्या सरी घेऊन तुला भिजवायला येते' या ओळी म्हणजे मिलनोत्सुक अधीरतेची उत्कृट अभिव्यक्ती आहे. पुढे 'पाखरा, तू दिला नाहीस बागेचा जरी पत्ता, तुझ्यापर्यंत वारा होऊन तुला उडवायला येते' या ओळींतून

व्यंकटेश चौधरी

जगण्याची असोशी दिसते.

नथ हा मराठी स्त्रियांचं मनमोहक आभूषण! या नथीचं मोठेपण मोठ्या दिमाखदार शब्दांत रुचिरा बेटकरांनी सांगितलं आहे.

**'नाकावरचा एकेक मोती तोलायला**
**आणि नथीचा नखरा करायलाही**
**बाईच व्हावं लागतं!**
**कारण घेतलेला दागिना,**
**मिरवणं इतकं सोपं नसतं...'**

जीवनाच्या वाटचालीत येणारा जीवही असाच दागिना असतो कदाचित.



'कोलाज भावनांचा' हा रुचिरा बेटकर यांचा इसाप प्रकाशनाने प्रकाशित केलेला पहिलाच कवितासंग्रह म्हणजे प्रेम, विरह, आठवणी, सकारात्मकता, व्याकुळता या भावनांचा स्वाभिमान आणि संविधानाच्या निळाईच्या पार्श्वभूमीवर घेतलेला धांडोळा आहे. आई-वडिलांच्या नावाची चादर जेव्हा आयुष्यातून निघून जाते तेव्हा आयुष्यातील प्रत्येक सकाळ ही जबाबदारीची जाणीव करून देते अशी अर्पण पत्रिका असणाऱ्या या संग्रहातून स्त्री जीवनाचे वेगवेगळे कंगोरे समोर येतात. मुक्तछंद तसेच लय, यमक असणाऱ्या या कवितेतून विविध भावभावनांचा अविष्कार संयत स्वरात झालेला लक्षात येतो. कवितांचा हा कोलाज म्हणजे कवयित्रीच्या काव्य लेखनाची आश्वासक सुरुवात ठरेल या आशेसह रुचिरा बेटकरना शुभेच्छा !

**- डॉ.योगिनी सातारकर-पांडे**

# स्त्रीमनाची भावस्पंदने: कोलाज भावनांचा

**कवयित्री रुचिरा बेटकर यांचा 'कोलाज भावनांचा' हा** पहिलाच कवितासंग्रह मराठी साहित्य विश्वात दाखल झाला आहे. संग्रह रूपाने हा कवितासंग्रह जरी पहिला असला तरी या कवितासंग्रहातील कविता मात्र मुरलेल्या लोणच्यासारखी चिरपरिचित आहे. दुःख, लोणचं आणि कविता जितकी दीर्घकाळ मुरत राहील तेवढीच तिची नजाकत अधिक असते. ही कविता विविध दिवाळी अंकात कधी वृत्तपत्रात वाचायला मिळालेली आहे. संग्रह रुपात सलग वाचत असताना लक्षात येते की रुचिरा बेटकर यांची कविता अर्थगहीरी, आशयघन आणि त्यांचा आत्मीक स्वर आळवणारी आहे.

स्त्री म्हणून असणारे कवयित्रीचे अनुभवविश्व ह्या कवितेतून प्रत्ययास आलेले आहे. स्त्री, तिच्या अंतःप्रेरणा, तिचा संघर्ष, तिचे भावजीवन आणि इच्छा-आकांक्षा यांचा समुच्चय यांचा दृश्यरुप आविष्कार म्हणजे 'कोलाज भावनांचा' हा कवितासंग्रह आहे.

मानवी आयुष्य हे कधीच एकरेषीय असतं नाही. ते एकरंगीही नसते. अनेकरेषीय, अनेकरंगी आयुष्य आपल्या सगळ्यांच्या वाट्याला येत असते. आयुष्याचा रंग करडा असतो. सुख-दुःखांची अनेकपदरी पोतडी म्हणजे मानवी जीवन. या जीवनाचा वेध घेणारी कविता रुचिरा बेटकर यांनी लिहिली आहे हे वाचताना जाणवत जाते.

**'भावनांची भरती आहोटी**
**स्पंदनात साठवीन म्हणते**
**ओंजळभर दुःख घेऊन**
**निळंशार सुख देईन म्हणते'**

सुख देईन म्हणते ही कवयित्रीची भावना मनाला स्पर्श करून जाते. स्त्री, भूमी या केवळ सुखाचे दान देत आलेल्या आहेत. दुःख घेऊन सुख देण्याची दातृत्व भावना कवयित्री प्रस्तुत ओळींमधून व्यक्त करते.


**'प्रीतीचे अनेक क्षण जगावेसे वाटते**
**मखमली तुझ्या मिठीत निजावेसे वाटते'**

या ओळी कवयित्रीच्या प्रेमव्याकुळ भावावस्थेतून आलेल्या आहेत. प्रेम हा अडीच अक्षरांचा प्रवास मात्र तो लाभणे हे परमभाग्याचे असते. प्रेमासाठी आसुसलेल्या मनातील उत्स्फूर्तता इथे आपल्याला कातर करत राहते.

**'मिठीत यायचं तर असा ये**
**की, क्षणानेही स्तब्ध व्हावं**
**मनाच्या खोल गाभाऱ्यातून**
**देहांना मुक्त वाटावं.'**

मिठी कवितेतील या शेवटच्या ओळी. प्रेमाचा अतिउच्च आविष्कार म्हणावा अशा आहेत. खऱ्या प्रेमात स्त्री-पुरुष यांच्यातील आकर्षणाच्या सीमारेषा पुसट होत जातात. देहातीत प्रेम ही प्रेमाची अतिउच्च अवस्था.

त्या अवस्थेत आपल्याला जायला हवे असे कवयित्री प्रतिपादन करते. मनाच्या गाभाऱ्यातील देवाला आपण ओळखू. देह मुक्त होईल पण प्रेम अमर राहील अशी भावना इथे अनुभवायला मिळते.



**'शोधत होते स्वतःला**
**फॉरगेट झालेली पाहिले मी**
**चुरगळा होता स्वप्नांचा**
**टारगेट झालेली पाहिले मी.'**

प्रत्येक माणूस स्वतःला शोधत राहतो. आपल्या अस्तित्वाचा शोध आयुष्यभर घेत राहतो. त्या शोधात अनेक वेळा अपयश येते. ती वाट म्हणावी तेवढी सोपी नक्कीच नसते. हा प्रवास दमवून

लक्ष्मण मलगिरवार

टाकणारा असतो आणि म्हणतात ना यशाला हजार नातेवाईक असतात अपयश मात्र पोरकं असतं. तो भावसंदर्भ कवयित्री स्पष्टपणे करते.

रुचिरा बेटकर यांचा 'कोलाज भावनांचा' हा संग्रह अतिशय आशयघन कवितांनी भरगच्च भरलेला आहे. मानवी मनातील विविध भावतरंग या कवितेतून आविष्कृत झालेल्या आहेत. रसिक वाचकांना ती आपल्या भावस्पंदनांनी नक्कीच गतकातर हळवं केल्याशिवाय राहणार नाही याची शाश्वती वाटते.

# स्वत्वाचा शोध घेणारी तरल कविता

## कोलाज भावनांचा

**पंडित पाटील बेरळीकर**

**कविता म्हणजे भावनांचा उत्स्फूर्त** आविष्कार असतो कोणताही कवी हे सांगू शकणार नाही मी ठरवून मला हवी तशी रचना साकार करीन! कवितेची निर्मिती प्रक्रिया हे एकद्या फुलाचे उमलणे बहरणे जसे आतून येते आणि बहरण्याबरोबर त्याच्या रंग छटाही फिकट किंवा गडद होत जातात त्याचप्रमाणे कवितेचे बहरणे आणि फुलणे ही क्रिया घडत असते. अंत:करणात असलेली चेतनाशक्ती त्या शक्तीच्या प्रभावाचे येणे जाणे जसे अबोध असते तसेच कवितेचे सूचने देखील गोढ अनामिक प्रक्रियेचा भाग असते. यासाठी सखोल चिंतन अविरत साधना असावी लागते अशीच एक जीवन साधनेतून अवतरलेली तरल आणि भावस्पर्शी कविता रुचिरा बेटकर या कवित्रीच्या 'कोलाज भावनांचा' या कवितासंग्रहात आली आहे. त्यांचा हा पहिला काव्यसंग्रह असला तरी कवितेचे नवखेपण त्यात आढळत नाही कविता वाचकांच्या पुढ्यात ठेवताना त्यांनी अतिशय सहजतेने त सांगून टाकले आहे की, हा माझा पहिलाच काव्यसंग्रह असून माझ्या मनाच्या कॅन्व्हासवर उमटलेल्या असंख्य भावनांच्या छटांचा हा एक प्रामाणिक कोलाज आहे. ती माझ्या आत्म्यांची भाषा आहे. त्यापुढे म्हणतात ही कविता वाचून कोणाच्या ओठावर हास्य फुलले किंवा डोळ्यात पाणी तरळले तर यासारखा दुसरा आनंद नाही. हा माझ्या कवितेचा विजय असेल. इतकं प्रांजळ शुभ्र स्फटीकासारखं अनुभव अनुभूतीचे पारदर्शीपणे या कवितेतून पाझरल्याचे स्पष्ट होते.

कवितेच्या संदर्भात असे म्हटले जाते की, कविता कधी चांगली वाईट नसते. ती एक तर असते किंवा नसते या पार्श्वभूमीवर रुचिरा बेटकर यांच्या कवितेकडे पाहताना असे लक्षात येते की त्यांनी मराठी साहित्य विश्वास सृजनशील कवयित्री म्हणून आपले स्थान नक्कीच निर्माण केले आहे. आपल्या जगण्यातून ठायी ठायी आलेले भावानूभव हे कवयित्रीच्या मनाच्या प्रेरणा होतात आणि शब्दांचा महोत्सव सुरू होतो.

त्यांनी हा कवितासंग्रह आपल्या आई-वडिलांना अर्पण केला आहे. त्या म्हणतात, आई-वडिलांच्या नावाची चादर जेव्हा आयुष्यातून निघून जाते तेव्हा आयुष्यातील प्रत्येक सकाळ ही जबाबदारीची जाणीव करून देत माता पित्याचे छत्र हरवल्यावर जगताना वाट्याला येणारा संघर्ष किती भयानक असतो दर्शविणारे हे वाक्य एखाद्या शिलालेखांसारखे काळजात करून ठेवावे असेच आहे.

या संग्रहातील कविता म्हणजे एक भावनेचा कोलाहल आहे खवळलेल्या सागराला भरती आणि ओहोटी यावी. ह्या स्वरूपाची भाव स्पंदने या कवितेत ओतप्रोत भरलेली आहेत. प्रेमातल्या आणाभाका झालेली अपेक्षाभंग, स्वप्नांच्या हिंदोळ्यावर स्वार झालेले मन, जगण्यातली तगमग, जीवनवाटेवरचे निखारे, अशा काही भाव सापेक्ष विषयाचे चिंतन या कवितेचा विषय झाला आहे.

प्रेम, समर्पण तसेच आयुष्याला लाभलेली दु:खाची किनार या गोष्टी दु:ख दृगो करण्यासाठी शब्दांशिवाय सुंदर साधन नाही यावर कवित्रीचा विश्वास आहे. या संग्रहात एकूण ऐंशी कविता आहेत आशयगर्भ चिंतन आणि सहज शब्दातून व्यक्त होणे हे या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे 'मी काय म्हणते'... या कवितेने आरंभ झालेला हा काव्यप्रवास 'पाकळी' या कवितेपर्यंत येऊन स्थिरावला आहे पाकळी या कवितेत कवयित्री म्हणते...

**फुलाची अंतिम पाकळी मी**
**गुलदस्त्या पेक्षा वेगळी मी**
**नको स्पर्धा फुलांशी इथल्या**
**स्वच्छंदी बागडाया मोकळी मी**

हे आत्मचिंतन शब्दात मांडताना ती अत्यंत सयंत आहे तिची कोणाशी स्पर्धा नाही तर इथे मुक्ततेचा ध्यास आहे आणि आरंभीच्या कवितेत मनात असलेली मरगळ आणि काळजात आलेलं नैराश्य घालविण्यासाठी भावनिक साद घातली गेली आहे.

**ओठाआड दडलेल्या शब्दांना**
**स्वर देईन म्हणते**
**मरगळत पडलेल्या आयुष्याला**
**नवचैतन्य देईन म्हणते**

इथे स्वत:ला सिद्ध करण्यासाठीची भावनिक गुंफण आहे आपल्या आत दडलेल्या शब्दांना स्वर देणे म्हणजे आपल्या आयुष्याच्या वाटेवर आलेली ग्लानी झटकून मुक्त होणेच आहे म्हणजे इथेही पुन्हा मुक्ततेचा ध्यास आहे. रुचिरा बेटकर यांच्या काव्यसंग्रहातील कवितेत भावनेच्या हिंदोळ्यावर स्वार झालेल्या मनाचा सुगंध आहे. प्रेमातल्या आणाभाका, रास क्रीडा, प्रेमाच्या स्वप्नरंजन कल्पना या गोष्टी सहज शब्दातून सजल्या आहेत तहानभूक या शरीरिक गरजा आहेत परंतु मानसिक गरजेचं काय? त्या अन्नपाणी घेऊन भागवता येतील परंतु मानसिक गरज भागवण्यासाठी मात्र भावनेची ओल असावी लागते त्यासाठी लागतो एक विश्वासू साथी!

**तू सोबत आलास की,**
**आभाळ पांघरल्यासारखे वाटते.**

ही स्वाभाविक प्रतिक्रिया प्रेमभावनेची सुखद अनुभूती सिद्ध करते. प्रियकराला आपल्या श्वासा इतकं मोल बहाल करणारी शुद्ध भावना चितारताना जी उत्कटता दृष्टीस येते ती या कवितेत आहे. 'नसावा श्वास पण जगण्यात हवायस तू...' हे शब्द कोंदण कवितेच सौंदर्य प्रदर्शीत करते.

कविता वाचताना अनेक वेळा शब्दाभोवती मनाचे रंजन फेर धरू लागते प्रेमातील उत्कटता आणि समर्पण या भावनेची जाणीव ठायी ठायी होऊ लागते. प्रीतीच्या समर्पणानंतर अधिकार गाजवण्याचा सहज प्रयत्न प्राप्त होतो मग प्रश्न उपस्थित होतात..

**सोडून सावलीला पळणार तू कितीसा?**
**केले मला वजा तर उरणार तू कितीसा?**

ही तादात्म्य भावना खऱ्या प्रेमातच असू शकते प्रेम भावनेच्या चरम सिमेपर्यंत पोहोचता येणे ही खूप अवघड गोष्ट आहे. त्यासाठी मुळात भावनिक ओल असावी लागते एकदा का अंत:करणात ओल निर्माण झाली ओढ निर्माण होते आणि वासनादी विकारांचा त्याग करून एकरूप व्हावे वागते.

**तुझ्या उबदार कुशीत शिरावेसे वाटते**
**डोळ्यांची पापणी पांघरावीशी वाटते**

कवी मनातील नानाविध भावनांचा हा कोलाज वाचकांच्या हृदयात नक्कीच घर करेल जीवनात आलेल्या वादळाचे सामर्थ्य झेलून पाय रोवून उभे राहण्याचे त्राण कवितेत आहे या संग्रहात अवतरलेली प्रत्येक कविता वाचकांच्या मनाला रुंजी घालणारी आहे. कवयित्रीने निवडलेली कवितेची स्वतंत्र पायवाट अधिक धोपट व्हावी यासाठी मनाच्या कॅन्व्हास विशाल व्हावा ही अपेक्षा आहे

इसाप प्रकाशनाने प्रकाशन सिद्ध केलेला हा संग्रह देखणा झाला असून संतोष घोंगडे यांच्या कुंचल्यातून साकारलेले मुखपृष्ठ असे समृद्ध आहे.

सुप्रसिद्ध साहित्यिक देविदास फुलारी यांची पाठ राखण आणि बाल साहित्य अकादमी सन्मान प्राप्त लेखक डॉक्टर सुरेश सावंत यांची प्रस्तावना यामुळे संग्रहाच्या मौलिक भर पडली आहे.



# भावछटांचा अंतर्मुख पट

## कोलाज भावनांचा

**अंजली कानिंदे मुनेश्वर**

**'कोलाज भावनांचा' हा कवितासंग्रह** वाचताना प्रथम जाणवते ती त्याची भावनिक प्रामाणिकता. या कविता कृत्रिम अलंकारांनी सजलेल्या नाहीत; त्या अनुभवातून आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यात एक नैसर्गिक ओलावा आहे. मात्र या कविता केवळ भावस्पर्शी नाहीत, तर आशय, प्रतिमा आणि रूपकांच्या स्तरावरही त्या विचार करायला भाग पाडतात. प्रत्येक कविता स्वतंत्र भासते, तरी संपूर्ण संग्रह वाचून झाल्यावर एक सुसंगत भावविश्व उभं राहतं.जणू विविध अनुभवांचे रंग एकत्र येऊन तयार झालेला अंतर्मुख पट.

मैत्रीचा सोहळा

**चेहऱ्यावर चे भाव सांगत,**
**उत्सव जगावेगळा**
**गळाभेट घेऊन साजरा केला**
**मैत्रीचा सोहळा.**
**शब्द नाही, बोल नाही,**
**नाही कुठला डाव,**
**बघ रे गड्या मैत्रीचा**
**अविर्भाव.**

या कवितेत मैत्रीची निरपेक्षता अत्यंत साधेपणाने व्यक्त होते. 'डाव' या शब्दातून आजच्या व्यवहारप्रधान नात्यांवर सूचक भाष्य केले आहे. शब्दांविना व्यक्त होणारा भाव,हीच खरी मैत्री, असा संदेश येथे अंतर्मुख करतो.

विसावा

**जीव जास्त जाळायला लागतो**
**मीलनासाठी थोडा दुरावा लागतो**
**प्रेम करते मी मीरेपरी**
**सिद्ध करण्या रोज का पुरावा लागतो**

'मीरेपरी' या संदर्भाने प्रेमाला भक्तीची उंची दिली आहे; परंतु लगेचच 'पुरावा' या शब्दातून आधुनिक नात्यांतील संशय आणि असुरक्षितता अधोरेखित होते. ही द्वंद्वात्मकता कवितेला गंभीर बनवते. जवळीक आणि अंतर यांचा समतोल साधण्याची जाणीव येथे आहे.

पुन्हा एकदा

**विस्मृती तूच धर हात मावळतीला**
**होऊ दे बालकासम मी अजाण पुन्हा एकदा**

मावळतीची प्रतिमा येथे समाप्तीची नसून नव्या आरंभाची आहे. बालकासारखी निरागसता पुन्हा अनुभवण्याची आकांक्षा या ओळीतून व्यक्त होते. ही कविता आत्मशुद्धीची आणि नव्याने जगण्याची हाक देते.

प्रेम पुरावा

**मी तिथेच पुन्हा एकाकी का उरावे**
**दे ना मज असे काही तू प्रेम पुरावे**

'पुन्हा' या शब्दाने भूतकाळाची सावली जाणवते. प्रेमातील खात्रीची मागणी येथे आत्मसन्मानाशी जोडलेली आहे. ही कविता भावनिक असली तरी आत्मभान जपते.

नभ

**होतील बघ सुरंगी**
**लाजून गाल हे**
**भेटीत पावसाच्या**
**हाती मशाल दे**

निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून उत्कटता व्यक्त करण्याची शैली येथे दिसते. पाऊस, लाज, मशाल.या प्रतिमांतून कोमलता आणि तीव्रता यांचा संगम साधला आहे.

गुलकंद

**आणला**
**गुलकंद तुझ्यासाठी**
**आणू किती गुलाब मी तुझ्यासाठी**
**झुरतोस का फांदीवरून गळणाऱ्या**
**एक एक पानगळी साठी**

गुलाबाचा गोडवा आणि पानगळ यातील विरोधाभास ही कवितेची मध्यवर्ती ताकद आहे. अर्पणभाव आणि विरहाची चाहूल एकाच वेळी जाणवते. प्रतिमासृष्टीतून भावनिक संक्रमण साधण्याची क्षमता येथे प्रकर्षाने दिसते.

**शोधत होते स्वत:ला**
**शांत रात्र अन् काजवे हजारात**
**फेव्हरेट होतांना पाहिले मी**

अंधारातच उजेड सापडतो.हा आत्मशोधाचा सूचक अर्थ या प्रतिमेत दडलेला आहे. शांततेत स्वत:ला भेटण्याची प्रक्रिया येथे साकारते.

लीप इयर

**प्रिय, लीप ईयरमधील एक दिवस तरी**
**माझ्याच नावाचा राहू देशील का?**

कालगणनेचा संदर्भ वापरून नात्यातील विशेषत्व व्यक्त करण्याची कल्पना वैशिष्ट्यपूर्ण आहे. साध्या प्रश्नातून गहिरे भाव व्यक्त होतात.ही कवयित्रीची शैलीगत ताकद आहे.

उसनवारी

**खर्चून झाले सारे क्षण**
**शब्दात गुंतवणूक करीन म्हणते**
**या जन्माची उसनवारी**
**याच जन्मी फेडीन म्हणते**

आर्थिक रूपकांद्वारे जीवनाचा हिशेब मांडणे ही या कवितेची वैशिष्ट्यपूर्ण कल्पना आहे. 'गुंतवणूक', 'व्याजदर', 'उसनवारी' या शब्दांनी भावनांना वास्तवाची किनार दिली आहे. जीवनाकडे जबाबदारीने पाहण्याची जाणीव येथे ठळक होते.

संग्रहाच्या आशयाइतकंच त्याचं सादरीकरणही उल्लेखनीय आहे. मुखपृष्ठाची रचना (संतोष घोंगडे) संग्रहाच्या भावविश्वाशी सुसंगत आहे. रंगछटांचा संयत वापर 'कोलाज' या संकल्पनेला दृश्य रूप देतो. मुखपृष्ठ केवळ आकर्षक नाही, तर अंतर्मुखतेची चाहूल देणारं आहे.

पुस्तकाची मांडणी सुबक आहे. अक्षररचना स्पष्ट आणि वाचकानुकूल आहे. वापरलेला कागद दर्जेदार असून छपाई स्वच्छ आहे. कवितांना पुरेशी मोकळी जागा दिल्यामुळे वाचन अनुभव अधिक सुसंवादी आणि समाधानकारक ठरतो.

एकूणच, 'कोलाज भावनांचा' हा संग्रह भावनिक ओलावा आणि विचारप्रवणता यांचा समतोल साधणारा आहे. साधी भाषा, प्रभावी प्रतिमा आणि प्रामाणिक आशय यांच्या साहाय्याने कवयित्रीने एक अंतर्मुख, मनात रेंगाळणारा शब्दपट उभा केला आहे.

# कोलाज भावनांचा

## वात्सल्याने कुरवाळणारी कविता

**शंकर वाडेवाले**

आत कुठेतरी जळते

**तेव्हांच कविता कळते.**

खरेतर रंगीबेरंगी फुलपाखरू उडतांना आपल्याही मनात विविध तरंग उठतात. खरच त्या फुलपाखराला पाहून आपलं मन प्रसन्न होते. लहानपणी तर आपण बागेत असो की, शेतात असो बेधुंद होऊन विविधरंगी फुलपाखरांच्या मागे त्याला पकडण्यासाठी वेड्यासारखे धावायचो.

पण आपण त्या विविधरंगी फुलपाखराच्या जन्मापासून त्याच्या या सुंदर होण्यापर्यंतच्या अवस्थेबद्दलची प्रक्रिया पाहिली तर ती एक कविताच होय, कोषातून निघणाऱ्या सुरवंटाचे फुलपाखरू होईपर्यंतचा जो संघर्ष, तो किती वेदनादायी असतो. यातच खरी कविता दडलेली असते. कविता म्हणजे असते काय तर आयुष्याच्या दुधाण्यात आलेली सुखदु:खाची साय कविता म्हणजे असते काय तर 'लेकराला वात्सल्याने कुरवाळणारी माय तर कधी वासरासाठी हंबरणारी गोठ्यातील गाय' खरच कविता म्हणजे असते काय तर मरणकाय यातना सोसून सुरवंटापासून झालेलं रंगीबेरंगी फुलपाखरू तर कधी पान्हावलेल्या गाईला ढुसण्या मारणारं गोठ्यातील वासरू. म्हणूनच मला वाटतं की, कविता ही आत भिजत गेल्याशिवाय खऱ्या अर्थानं रुजत नाही.

अशाच आशयाची विविध रंगांनी, विविध रुपांनी व प्रतिमांनी नटलेली कविता भावनांचा कोलाज या कवितासंग्रहातून आलेली आहे ही कविता सहज आपले लक्ष वेधून घेते. पहिल्याच कवितासंग्रहात कुठेच नवखेपणाची जाणीव होत नाही. कवयित्री अतिशय नेटकेपणाने आशयसंपन्न भाव आपल्या कवितेतून शब्दबद्ध करते. लय, ताल व आशयाने संपन्न असलेली ही कविता मनाला भुरळ घालते. कवयित्री नुसतीच शब्दांची जुळवाजुळव करत नाही तर वास्तव जगण्यातील अनुभव ते प्रेमचे असो की दु:खाचे असो ते प्रामाणिकपणे शब्दबद्ध करते

या संग्रहात गजल सदृश्य कविता अनुभवायास मिळतात. कवयित्रीची भाषा,साधी व सोपी आहे.प्रत्येक कविता अस्खलित अनुभवाची साक्ष देते. भावनांचा कोलाज हे नावच कवयित्रीच्या अंतर मनातील भाव भावनांच्या चाललेल्या स्पंदनांची साक्ष देते.

डोळयांची भाषा या कवितेतून भावाभिव्यक्त करताना कवयित्री म्हणते

**डोळ्यांची भाषा डोळ्यांना कळते**
**हृदयीचे गाणे ओठांवर फुलते**
**दिस अन् रात स्वप्नातच सरते**
**स्वप्नांच्या डोक्यावरती मन माझे झुलते**
**सारे काही तुजलाही कळते**
**सारे काही मजलाही कळते**
**भाव मनीचा डोळ्यांनी वदते**
**रोग जडूनी भान हरपते**
**मन वणवण मागे फिरते**
**पाऊल माझे तुझ्याकडे वळते**
**डोळ्यांची भाषा डोळ्यांना कळते**
**हृदयीचे गाणे ओठांवर फुलते**

भावाभिमुख करणारी रुचिरा बेटकर यांची कविता स्वत:चा स्वतंत्र चेहरा घेऊन येणारी कविता आहे.

स्त्रीला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे व तिला मुख्य प्रवाहात आणणारे क्रांती सूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांच्या विषयी व्यक्त होताना कवयित्री अभिवादन करून कृतज्ञता व्यक्त करताना म्हणते –

**पाऊस पाडून अक्षरांचा**
**चिंब भिजवली दीनदूबळ्यांची मुलें**
**तूच ज्ञानदाता तूच आराध्य दैवत**
**तूच कैवारी महात्मा ज्योतिबा फुले**

फुले, शाहू,आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचाराने पुरोगामीत्वाला बळ तर दिलेच पण ज्या काळात स्त्रीला कुठलेच स्वातंत्र्य नव्हते अशा काळात महात्मा फुल्यांनी पुण्यासारख्या शहरात प्रतिगाम्यांच्या नाकावर टिच्चून मुलींची शाळा काढली व ती सर्व संकाटांवर मात करून चालवली व स्त्री जातीच्या पायातील गुलामीचे जोखड झुगारून दिले. याची जाणीव कवयित्रीला आहे. त्यामुळेच आपण शिकू शकलो व लिहू शकलो याच्याबद्दलचा कृतज्ञ भाव कवयित्रीने वरील कवितेतून व्यक्त केला आहे.

काही गोष्टी अशा असतात की, प्रयत्न करूनही मिळत नाहीत पण काही गोष्टी आपोआपच आयुष्यात येऊन ध्यानी मनी नसताना आपल्या आयुष्याला अचानकच उभारी देऊन जातात म्हणून कवयित्री आपल्या शब्दातून अशी सहज व्यक्त होते.

**उशास चिकटलेल्या अश्रूंच्या**
**त्या रात्रींचा हिशोब काय ठेवणार**
**प्रत्येक जून्या आठवणींच्या**
**पाऊलखुणा पुष्कळ सजलेल्या**
**विरहात बुडालेल्या**
**त्या दु:खांचा हिशोब काय ठेवणार**

निती मूल्य ढासळत असताना रुचिरा बेटकर यांची कविता आपल्या कवितेतून ती ढासळणार नाहीत याची खबरदारी घेते ही चांगली गोष्ट आहे.

ती कविता एवढ्यावरच थांबत नाही तर ती भविष्यातील आव्हानं पेलण्यासाठीही सज्ज आहे एवढी ती आश्वासक आहे. या कवितासंग्रहातील जवळपास सगळ्याच कविता एक नवा विचार घेऊन मुशाफिरीला निघाल्या आहेत असे मी म्हणेन 'कोलाज' ही या कवितासंग्रहातील एक अशीच महत्वाची कविता आहे.

**स्वत:शीच आपुलकीची कला**
**कधी साधली नाही**
**जगून घेतली जिंदगी**
**जरी मीच चांगली नाही**
**असे कित्येक मोसमी वारे**
**आले आणि गेले**
**एका सुखाची सर मुक्कामी**
**कधी थांबली नाही**

अतिशय आश्वासक असा हा कवितासंग्रह नेमका, नेमका आणि सुबक निघाला आहे. एकूण ऐंशी कविता असलेला शहान्नव पानी हा कवितासंग्रह अंतर्बाह्य देखना व पहाताच क्षणी रसिक वाचकाला भूरळ घालेल असा झाला आहे.

हे वृत्तपत्र मालक प्रकाशक संपादक राम गंगाराम तरटे यांनी मुद्रक नरसिंह पांडुरंग घोणे यांच्या मॅजिक पब्लिकेशन शॉप नंबर १० मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स गांधी चौक लातूर जिल्हा लातूर- ४१३५१२ येथे छापून घर क्रमांक १ , मुस्तापूर ता.नायगाव जिल्हा नांदेड ४३१६३२ येथे प्रकाशित केले आहे. RNI NO. MHMAR/25/A2579. Mob. No. 8177826043 , 8600852183.

This News Paper Has Owner, Publisher and Editor Ram Gangaram Tarte, Printed parmeshwar Narsihn Ghonase Magic Printars & Publication shop no.10, manapa shopping complex, Gandhi Chowk, Latur - 451335. Published at 1, mustapur, tq.Naigaon, Dist. Nanded - 431632 ( MS) . RNI NO - MHMAR/25/A2579.